# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 19.03.2024** **वार–मंगळवार**

---

**<u>नियंत्रण कक्ष</u>**

आगामी लोकसभा निवडणुकीतील पैशांचा गैरवापर रोखण्यासाठी पुण्यातील प्राप्तीकर कार्यालयानं 24 तास कार्यरत राहणारा नियंत्रण कक्ष सुरु केला आहे. या कक्षातील 1800-233-0353 अथवा 1800-233-0354 या मोफत दूरध्वनी क्रमांकावर नागरिकांना तक्रार दाखल करता येईल. तसंच 9420244984 या व्हाट्स अप क्रमांकावर देखील तक्रार नोंदवता येईल. पुण्यातील या नियंत्रण कक्षात पुण्याबरोबरच पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवडणुकीशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारांच्या तक्रारीही स्वीकारल्या जातील. मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हा नियंत्रण कक्ष सुरु राहणार आहे.

**<u>मतदान</u>**

ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागातील मतदारांमध्ये मतदानाबद्दल दिसणारा निरुत्साह लक्षात घेऊन यंदा प्रशासनाकडून शहरी भागावर लक्ष केंद्रित केलं जाणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक शाखेनं दिली आहे. लोकसभेच्या गेल्या निवडणुकीत जिल्ह्यातील मावळ, बारामती आणि शिरुर या ग्रामीण भागातील मतदारसंघांच्या तुलनेत पुणे शहर लोकसभा मतदार संघात सर्वात कमी मतदान झालं होतं.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागात 148 शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे. याविषयीची माहिती पालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**<u>राष्ट्रीय स्वयंसेवक संघ</u>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभा गेल्या 15 ते 17 मार्च या कालावधीत नागपूरमध्ये झाली. या निमित्ताने संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक सुरेश जाधव यांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेत या बैठकीची माहिती दिली. आगामी काळात संघाचे स्वयंसेवक स्व-आधारित व्यवस्था, पर्यावरण, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन आणि नागरी कर्तव्य या ‘पंच परिवर्तनाच्या सूत्रांवर आधारित काम करतील असं जाधव यांनी सांगितलं. शंभर टक्के मतदान, समरसता ही जीवनशैली बनावी यासारख्या विविध मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करून स्वयंसेवक कार्यरत राहतील, असं जाधव म्हणाले.

**<u>अहिल्यादेवी होळकर अध्यासन</u>**

अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला जातीपातीच्या राजकारणात न अडकवता त्यांचे विचार आणि राष्ट्रीयत्वाचं धोरण पुढे नेणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर यांनी काल पुण्यात केलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राची स्थापना काल झाली; त्यावेळी ते बोलत होते. भारत

इतिहास संशोधन मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या बोधाचिन्हाचं अनावरण मान्यवरांच्या हस्ते झालं.

**<u>मसाप</u>**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनादुरुस्तीचं काम अंतिम टप्प्यात आलं असून त्याचा मसुदा येत्या एक दोन महिन्यात होणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत ठेवून त्याला मंजूर केला जाईल. त्यानंतर विशेष सर्वसाधारण सभा बोलावून त्या घटनेची मान्यता घेण्यात येईल असं मसापचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी सांगितलं आहे.

**<u>आरोग्य</u>**

पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रम आणि प्रौढ लसीरकण मोहिमेंतर्गत 14 प्रकारच्या लसी दिल्या जातात. या लासी साठवण्यासाठी वॉक इन कूलरचा वापर केला जणार असल्याची माहिती महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांनी दिली.

**<u>क्रिकेट</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाने अजिंक्यपद पटकावलं आहे. पुणे विद्यापीठ संघाने अंतिम फेरीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ संघाला 37 धावांनी पराभूत केलं.

**<u>हॉकी</u>**

नेहरूनगर इथल्या मेजर ध्यानचंद मैदानावर सुरू असलेल्या 14 व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आज कर्नाटक संघाने दिव दमण संघाचा 12-0 असा धुव्वा उडवला. तर मणिपूर संघाने उत्तराखंड संघाला 11-2 अशी मात दिली.

**<u>क्रीडा</u>**

विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पोर्ट्स लीग स्पर्धेत भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाच्या आर्किटेक्चर संघाने विजेतेपद पटकावलं. मुलींच्या गटात भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघ अजिंक्य ठरला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरांत आज कमाल तापमान 36 आणि किमान 16 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, उद्याही साधारण असंच तापमान असेल अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**